# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
**(Formerly Pune University)**
**Ganeshkhind, Pune – 411007**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone : **020-25621188/89**
ईमेल / **Email : affiliation@pun.unipune.ac.in**

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट/ **Website:** www.unipune.ac.in


संदर्भ क्र.: सीए/२०९

दिनांक : 05/02/2024

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक,**
प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधित महाविद्यालये/
सर्व संबंधित मान्यता प्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/केंद्र

**विषय : महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये दस्तावेज (Documents) अपलोड करणेकामी**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयांविषयी/परिसंस्थाविषयी विविध प्रकारच्या कागदपत्रांची (उदा. संस्था स्थापनेबाबत संबंधित प्राधिकरणाचे प्रमाणपत्र, शासन प्रमाणपत्र, महाविद्यालयाची/परिसंस्थेची स्थापना, पहिल्या वेळेच्या मान्यतेसंबंधीचा शासन निर्णय, विद्यापीठाकडून पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत देण्यात आलेले पत्र, महाविद्यालयांना/परिसंस्थांना वेळोवेळी नविन विषय /अभ्यासक्रम/विद्याशाखा/विशेषस्तर विषय/तुकडी इत्यादीच्या मान्यतेबाबतचा शासन निर्णय, सदरबाबत प्रस्तुत विभागामार्फत देण्यात आलेल्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाचे पत्र, विविध अभ्यासक्रमांच्या स्थायी संलग्नीकरणाबाबतचे प्रस्तुत विभागामार्फत देण्यात आलेले पत्र, विविध अभ्यासक्रम/तुकडी/महाविद्यालय/परिसंस्था इ. बंद करणे, महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या ठिकाणाचे स्थानांतरण, संस्था हस्तांतरण महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या नावातील बदल इत्यादीबाबत प्रस्तुत विद्यापीठ, संबंधित शिखर संस्था व शासनामार्फत देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र/मान्यतापत्र, व इतर महत्त्वाचे दस्तावेज) महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित शिखर संस्था इ. कडून तसेच नॅक मूल्यांकन/पूनर्मूल्यांकनाकरिता विविध स्तरांवरुन मागणी केली जात असल्याने सदर कागदपत्रे महाविद्यालयांकडून मागवून घ्यावी लागतात.

तरी सदर दस्तावेज/कागदपत्रे संबंधित महाविद्यालयांनी महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये www.unipune.ac.in या संकेत स्थळावरील BOD - BOD Online – Login (Username & Password)-- > Document Verification 2023-2024 या लिंकवर काळजीपूर्वक भरून सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी **दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी** अपलोड करावेत.

कळावे,

आपला,

(गिरीश पुं. बेत)
उपकुलसचिव, संलग्नता कक्ष

D:\1) 29-01-2024 General\Circulars 29-01-2024.docx